REGISTERED No. B. 3434




# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २९ मे १९४६ अंक २२


## —: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच


## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

डोंगरे यांच्या बालामृतानें अशक्त मुलें सशक्त होतात




पंढरीनाथ ब्रिलिअन्टाईन वापरा




पुणें चीफ एजंटसः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें

छत्रे यांचा -कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालकः—एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड मुंबई ४.
फो. नं. ३३८४९

घोडा छाप शाईच्या पुड्या
★ दांडेकर कंपनी मुंबई २८. ★






## विविध माहिती

**व्हिटॅमिन वड्यांचें उत्पादन**—व्हिटॅमिनच्या वड्यांचें उत्पादन हातीं घेण्याचा मद्रास सरकार विचार करीत आहे, असें समजतें.

**फ्रान्सला ९० कोटि रुपये कर्ज मंजूर**—अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेनें फ्रान्सला औद्योगिक पुनर्घटनेसाठी ९० कोटि रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे.

**बाँबे क्लोरिन प्रॉडक्टस लि.**—कॉस्टिक सोडा, क्लोरिन, हैड्रोक्लोरिक ॲसिड, ब्लीचिंग पावडर, इत्यादींच्या उत्पादनासाठी वरील कंपनी स्थापन झाली असून ती मुंबई येथें कारखाना काढणार आहे.

**लंडनच्या केंद्रस्थानास प्रतिस्पर्धी**—युद्धकाळांत तारांची वहातूक बंद पडूं नये, म्हणून हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिआ आणि न्यू-झीलंड हीं अमेरिकेशीं परस्पर जोडण्यांत आलीं. ही व्यवस्था कायम ठेवण्यांत यावयाची आहे. ह्यामुळें लंडनचें पहिलें महत्त्व बरेंच कमी होणार आहे व उत्पन्नहि बुडणार आहे. पॅलेस्टाइन, सिलोन, मलाया, हाँगकाँग इत्यादींशींहि अमेरिका अशीच जोडण्यांत येणार आहे. इंग्लंडमध्यें ह्याबद्दल असंतोष व्यक्त करण्यांत आला आहे.

**सहकारी शेती**—स्वतःच्या जमिनी नसलेल्या मागसलेल्या लोकांच्या उद्धारासाठी त्रावणकोर संस्थाननें सहकारी पद्धतीनें शेती करण्यासाठी ४० वसाहती स्थापन केल्या आहेत.

**"लॉइड्स"चे सभासद**—मुंबईचे सुप्रसिद्ध व्यापारी सर चुनीलाल भाईचंद मेहता ह्यांची लंडन येथील "लॉइड्स" ह्या संस्थेचे अंडररायटिंग सभासद म्हणून निवडणूक झाली आहे. हिंदी गृहस्थाची ही पहिलीच निवडणूक आहे.

**ब्रेटनवुड्स संस्थांस मान्यता द्यावी**—ब्रेटनवुड्स करारांतर्गत इंटरनॅशनल मोनेटरी फंड आणि इंटर नॅशनल बँक ह्या संस्थांशीं सहकार्य करण्यांत व त्यांचेमार्फत आपले व्यवहार घडवून आणण्यांत हिंदुस्थानचा फायदा आहे असें रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर चिंतामणराव देशमूख ह्यांनीं नुकतेंच आपल्या भाषणांत सांगितलें.

**हिंदी आर्थिक परिस्थितीची पहाणी**—हिंदी आर्थिक परिस्थितीची पहाणी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें डॉ. एन. एस. आर. शास्त्री ह्यांची योजना केली आहे.


**अधेली व पावली निकेलची होणार**—अधेली आणि पावली ह्या नाण्यांसाठी आजच्या परिस्थितींत चांदी वापरणें निष्कारण खर्चाचें आहे, असें हिंदुस्थान सरकारचें मत झालें आहे. पुरेशी चांदी बाजारांत नाहीं आणि चांदीची किंमतहि भरमसाट वाढली आहे. ५०% चांदी असलेलीं नाणीं ह्यापुढें काढण्याचें आतां बंद करण्यांत आलें आहे. त्याऐवजी निकेलचीं नाणीं काढण्यांत येतील. १९४३ ते १९४५ ह्या मुदतींत हिंदुस्थान सरकारनें अमेरिकन सरकारकडून २२३ कोटि औंस चांदी उसनी आणली होती. ती युद्धसमाप्तीनंतर पांच वर्षांत ऐनजिनसी परत केली पाहिजे. तसें करण्यास हिंदुस्थान सरकारचा हा निर्णय थोडातरी उपयोगी पडेल.

**पीक कर्जें**—बाँबे अॅ. डे. रिलीफ ॲक्टान्वयें ज्यांच्या कर्जाची तडजोड झाली आहे, अशांना पीक कर्जें देण्यासाठीं मुंबई सरकारनें रत्नागिरी, पुणें, अहमदनगर, सातारा व नाशिक ह्या जिल्ह्यांच्या कलेक्टरचे स्वाधीन १५ लक्ष रुपये केले आहेत.

**आफ्रिकेकडे ९० पाद्री रवाना**—इंग्लंडमधून आफ्रिकेकडे ९० रोमन कॅथॉलिक पाद्री नुकतेच रवाना झाले. ते तेथें १० वर्षें काम करणार आहेत.

**चहाचा खप**—इंग्लंडमध्यें दरमाणशीं दरसाल चहाचा खप ९ पौंड आहे. हिंदुस्थानांत तो एकतृतीयांश पौंडाहून अधिक नाहीं. टी मार्केट एक्सपान्शन बोर्डानें हिंदुस्थानांत प्रचार करून लोकांत चहाचा प्रसार वाढविण्याचें ठरविलें आहे. कारखान्यांतील मजुरांस चहाची संवय लावणें, सिनेमाद्वारा प्रचार करणें, मोठाल्या शहरांतून फॅशनेबल चहाचीं दुकानें उघडणें, इत्यादि मार्गांचा त्यासाठीं अवलंब करण्यांत येईल.

तोच सुदिन
कीं
ज्या दिवशीं भारतावर
स्वातंत्र्यसूर्य चमकेल
पण हा सुदिन आपण स्वयंसिद्ध झाल्याविना कसा दिसेल!
याकरतां देशांतील सर्व उद्योगधंदे पूर्ण राष्ट्रीय करून परदेशांत जाणारा द्रव्यौघ थांबविणें, हें आपलें आद्यकर्तव्य ठरतें.
तरी आयुष्याच्या विम्याचा धंदा करणारी
येथील सुप्रसिद्ध
कॉमनवेल्थ
विमा कंपनी लि.,
येथें आपला स्वतःचा विमा उतरून आपल्या कर्तव्यांतून मुक्त व्हा.
एजन्सीसाठीं आजच लिहा अगर भेटा
ल. ब. उर्फ अण्णासाहेब भोपटकर—अध्यक्ष
एस. एम. जोशी—मॅनेजिंग डायरेक्टर
ब



# गूळ करणारानें इनकमटॅक्स दिला पाहिजे

## शेतीच्या उत्पन्नाची व्याख्या : महत्त्वाचा निर्णय

महाराष्ट्रांतील एका मोठ्या लिमिटेड कंपनीचा साखरेचा कारखाना आहे व त्यासाठीं कंपनीनें उसाची लागवड केलेली आहे. १९३८-३९ मध्यें कंपनीनें उसाचा गूळ करून विकला. ह्या गुळाच्या व्यवहारांतील नफा वेगळा समजतां येणार नाहीं; कंपनीचा सर्वच नफा प्राप्तीवरील करास पात्र आहे असें इनकम टॅक्स अधिकाऱ्यानें ठरविलें. गुळाचें उत्पन्न हें शेतीचें उत्पन्न आहे, असें कंपनीचें म्हणणें होतें. तें अपिलेट असिस्टंट कमिशनरनें मान्य केलें. त्यावर इनकमटॅक्स ऑफिसरनें इनकम टॅक्स अपिलेट ट्रायब्यूनलकडे अपील केलें. गूळ करण्याची कंपनीची पद्धति ही शेतकऱ्यांच्या नेहमीच्या पद्धतीची नाहीं. लोखंडी क्रशर्स व ऑईल इंजनें ह्यांचा कंपनी उपयोग करते म्हणून कंपनीचें गुळाचें उत्पन्न शेतीचें उत्पन्न नाहीं; तें करास पात्र आहे असा ट्रायब्यूनलने निकाल दिला. कंपनीचा ऊस चाऊन खाण्याजोगा नाहीं, तो कडक असून त्याचा गूळ केल्याखेरीज तो विकतां येणार नाहीं, ही प्रत्यक्ष परिस्थिति ट्रायब्यूनलनें विचारांत घेतली नाहीं, असें सांगून "इनकम टॅक्स कायद्यांत ज्या उत्पन्नास शेतीचें उत्पन्न असें म्हणण्यांत येऊन त्यास प्राप्तीवरील कराची माफी देण्यांत आली आहे, अशा उत्पन्नाचे व्याख्येंत कंपनीचें गुळाचें उत्पन्न बसतें किंवा नाहीं ?" हा महत्त्वाचा प्रश्न कंपनीने उपस्थित केला व त्यावर हायकोर्टाचा अभिप्राय मागविण्यांत आला.

शेतीच्या उत्पन्नाची व्याख्या कायद्यांत पुढीलप्रमाणें करण्यांत आली आहे : "शेतीच्या जमिनींतून शेती करून अगर शेतीचा माल बाजारांत नेऊन विक्रीला योग्य होईल अशी प्रक्रिया करून अगर शेतीच्या मालाची वरील प्राक्रिया करून नंतर विक्री करून जें उत्पन्न निघतें तें शेतकीचें उत्पन्न होय. वरील उत्पन्न ज्यांना मिळतें त्यांत शेतकी करणारा शेतकरी व अर्धेलीने अगर इतर वाट्यानें उत्पादन नेणारा जमीनदारहि येतो." म्हणजे, ज्या प्रक्रियेखेरीज माल बाजारांत ठेवताच येत नाहीं तेवढ्याच प्रक्रिया ह्यांत अभिप्रेत आहेत. उदाहरणार्थ, बाजरीचीं अगर ज्वारीचीं नुसतीं धाटें बाजारांत धान्यपदार्थ म्हणून विकलीं जाणार नाहींत, तर तीं मळून, चाळून त्याचे दाणे काढल्यावरच त्याला बाजारांत किंमत येईल. एवढीच प्रक्रिया करून मालाची म्हणजे ज्वारी-बाजरीच्या दाण्यांची विक्री करून जें उत्पन्न येईल, तें शेतकीचें उत्पन्न होय.

### मुंबई हायकोर्टाचा अभिप्राय

"कंपनीनें गूळ बनविण्याची अवलंबिलेली पद्धति ही सामान्य शेतकऱ्याच्या पद्धतीप्रमाणेंच आहे, ही गोष्ट सिद्ध झालेली आहे. मोठाले बागाइतदार ऊस गाळण्यासाठी ऑइल इंजनें वापरतात व लहान शेतकरी बैलाच्या सहाय्यानें गुऱ्हाळें चालवितात. तेव्हां, यंत्राचा उपयोग केला, म्हणून तेवढ्याने क्रिया किंवा पद्धति बदलत नाहीं. ही क्रिया उपयोगांत आणली, तिचा उद्देश ऊस बाजारांत नेण्यास योग्य करणें हा होता, हें मात्र सिद्ध व्हावयास पाहिजे. परंतु, विक्री झाली आहे ती गुळाची; उसाची नव्हे. शेतमालावर एकादी क्रिया केली तरी त्या मालाचें मूळ स्वरूप कायम राहिलें पाहिजे (त्या अवस्थेंत मालाची विक्री होणें अशक्यच असलें तर गोष्ट वेगळी) असा अर्थ कायद्यांतील व्याख्येंत अभिप्रेत आहे. कंपनीने तयार केलेला ऊस इतर साखर कारखान्यांत तिला विकतां येणें शक्य आहे किंवा कंपनीच्या स्वतःच्या कारखान्यांत गूळ किंवा साखर करण्यासाठी तिला उपयोगांत आणतां येईल. प्रत्येक साखर कारखानदाराची स्वतःची उसाची लागवड असतेच, असें नाहीं व प्रत्येक शेतकरी स्वतःचा ऊस स्वतः गाळतो असेंहि नाहीं. कंपनीचा ऊस कडक असल्यामुळें खाण्यास उपयोगी नाहीं, असें सांगण्यांत आलें, परंतु अशा प्रकारच्या उसास खरेदीदार मिळणार नाहीं, असें होणार नाहीं. कांहीं विशिष्ट लोकांस ह्या उसाचा उपयोग नसला तरी इतरांस होईल. ते त्याची खरेदी-विक्री करतातच. कांहीं कंपन्यांच्या हिशेबांत "उसाची खरेदी" ह्या खातीं मोठाल्या रकमा खर्ची पडलेल्या दिसतात. म्हणून, कायद्यांतील व्याख्येप्रमाणें कंपनीच्या उसास गिऱ्हाईक आहे. तेव्हां, तो ऊस विकण्यासाठी त्याचा अगोदर गूळ करण्याचें इनकमटॅक्स कायद्याच्या दृष्टीने कारण नाहीं. म्हणून, कंपनीने गुळाच्या विक्रीपासून मिळविलेलें उत्पन्न हें शेतीचें उत्पन्न नाहीं."

मुंबई हायकोर्टाच्या या अभिप्रायाचा गूळ करणाऱ्या उसाच्या बागायतदारांवर व कंपन्यांवर होणारा परिणाम महत्त्वाचा असल्याकारणाने त्याकडे वाचकांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे. उसाची लागवड करणारा ऊस विकूं शकतो, त्याचा गूळ करणें उसाच्या विक्रीस आवश्यक नाहीं, ह्या मुद्यावर गुळाच्या विक्रीचें उत्पन्न हें शेतीचें उत्पन्न नाहीं, असें आतां अधिकृत रीत्या ठरलें आहे. अर्थात, त्यावरही अपिलास जागा आहे. परंतु आज महाराष्ट्रांत उसाचा गूळ करून पैसा कमविणारे कित्येक शेतकरी व बागायतदार आहेत, त्यांस आतां इनकमटॅक्सची माफी मिळणार नाहीं. दोन हजारांवरील उत्पन्नावर त्यांस इन्कम टॅक्स द्यावा लागेल आणि हा कर यापुढील उत्पन्नावरच केवळ आकारण्यांत येईल, असें नसून कायद्याप्रमाणें मागील कांहीं वर्षांचें उत्पन्नहि प्राप्तीवरील करास पात्र धरलें जाईल. गूळ करून विकण्याचा धंदा शेतीचा धंदा नव्हे, हें तत्त्व मध्यवर्ती सरकारला चांगलेंच फलदायक होणार आहे.

### साडेतीन टक्क्यांच्या रोख्यांची परतफेड

व्याजाचे दर खाली उतरले आहेत आणि हिंदुस्थान सरकारची रिझर्व्ह बँकेंत शिल्लकहि मोठी आहे; ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन हिंदुस्थान सरकारनें आपल्या बिन मुदतीच्या ३½% च्या रोख्यांचे पैसे परत करण्याचें ठरविलें आहे. १६ सप्टेंबर, १९४६ रोजीं हे पैसे परत दिले जातील. बिनमुदतीचीं कर्जें फेडण्यास रोखेवाल्यांस तीन महिन्यांची नोटीस द्यावी लागते, त्याप्रमाणें आतां ती देण्यांत आलेली आहे. प्रत्येक रोख्याच्या दर्शनी किंमतीइतकी रक्कम देण्यास सरकार बांधलेलें आहे, आणि दर्शनी किंमतीपेक्षा बाजारांतील किंमत आतां ज्यास्त असल्याकारणानें, परतफेडीस ही वेळ अनुकूल आहे. १८४२, १८५४, १८६५, १८७९ व १९०० अशा पांच वर्षी सरकारनें वेगवेगळीं ३½% चीं बिनमुदतीचीं कर्जें उभारलीं, तीं सर्व आतां फेडण्यांत येत आहेत. ज्यांचेजवळ ह्यापैकी रोखे असतील, त्यांस ३% बिनमुदतीचे नवे कर्जरोखे बदली मिळूं शकतील. ते नको असले, तर २¾% चे, १९७६ सालीं परत फेडावयाचे कर्जरोखेहि त्यांस घेतां येतील. १०० रुपयांचा हा रोखा ९९ रुपयांस मिळेल. १६ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर ह्या मुदतींतच वरीलपैकी कोणतेहि रोखे ३½% च्या बदली मिळूं शकतील. त्यानंतर रोखेवाल्यांस रोख्यांची दर्शनी किंमत रोखीनें दिली जाईल. ३% व २¾% च्या वरील रोख्यांसाठी रोख रकम देणारांचे अर्ज स्वीकारले जाणार नाहींत. ३½% रोखेवाल्यांसाठीच ते कर्जरोखे राखून ठेवण्यांत आले आहेत. एकूण सुमारें २८४ कोटि रुपयांच्या रोख्यांची ह्याप्रमाणें परतफेड केली जाईल व एवढ्या रकमेवर सरकारास ह्यापुढें ३½% ऐवजी ३% पेक्षा ज्यास्त व्याज द्यावें लागणार नाहीं.

# स्फुट विचार

## हिंदुस्थानांतील अन्नधान्य परिस्थिति

अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. ट्रूमन यांचे प्रतिनिधि मि. हर्बर्ट हूवर नुकतेच हिंदुस्थानांत येऊन गेले. त्यांनीं अमेरिकन सरकारला सादर केलेल्या अहवालांत हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांच्या तातडीच्या अन्नधान्याच्या गरजेचे आंकडे पुढीलप्रमाणें दिले आहेत; चालू सालच्या मे, जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या महिन्यांत मिळून प्रांतिक गरजा त्यांच्या मतें अशा; मुंबई ३ लाख ३० हजार टन, म्हैसूर १ लक्ष १४ हजार टन, मद्रास ८ लक्ष ९० हजार टन, त्रावणकोर ५८ हजार टन, कोचीन ३६ हजार टन, बिहार ९३ हजार टन, संयुक्तप्रांत १ लक्ष ४४ हजार टन, बंगाल ३ लाख २ हजार टन, इतर प्रांत २ लाख ५० हजार टन. वरील आकडे हिंदुस्थान सरकारच्या माहितीवर आधारलेले आहेत असें मि. हूवर म्हणतात. इकडे संयुक्त राष्ट्रांच्या धान्य-समितीनें हिंदुस्थानची मूळची मागणी चार-पंचमांशानें कमी केली. परंतु त्याविरुद्ध बरीच टीका झाल्यामुळें अखेर ती कमी केलेल्या मागणीच्या दुप्पट मान्य करण्यांत आली. म्हणजे ४० लाख टनांची मूळची मागणी असता फक्त २० लाख टनाला मंजुरी देण्यांत आली आहे. ही मंजूर झालेली मागणी प्रत्यक्ष हातीं पडण्यासाठीं काय उपाययोजना होणार व ती त्वरित होणार कीं नाहीं, याविषयीं प्रे. ट्रूमन यांनीं कांहींच खुलासा केलेला नाहीं. दरम्यान ब्रह्मदेशांतून तांदूळ येण्याची आशा नाहीं. कारण चालू सालचें तेथील पीक ब्रह्मी लोकांनाच पुरेल कीं नाहीं याची शंका आहे. इंडोनेशियन सरकारनें ५ लाख टन तांदूळ कापडाच्या बदली देण्याची तयारी दाखविली आहे. परंतु या बाबतींत हिंदुस्थान सरकारकडून कांहीं उत्तर जाहीर झालेलें नाहीं. तथापि मुंबई प्रांताचे अर्थमंत्री श्री. दिनकरराव देसाई वाटाघाटीसाठीं विमानानें जाव्हास जाण्यास निघणार आहेत असें समजतें.

## डॉ. राव यांची स्पष्टोक्ति

दरम्यान संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व शेतकी समितीपुढें हिंदुस्थानांतील धान्य परिस्थितीची कल्पना येणारें भाषण केलें. डॉ. राव यांनीं एक महत्त्वाची सूचना केली आहे. ती अशी कीं जगांतील कोणताहि देश असो त्यांत शिधापद्धति अंमलांत आणणें जरूर आहे. अमेरिकेंत ही पद्धति अंमलांत आणण्याच्या कामीं जी दिरंगाई दिसून येत आहे तीवर डॉ. राव यांचा रोख होता. अमेरिका धान्य निर्यात करणारें राष्ट्र आहे आयात करणारें नाहीं, डॉ. राव यांनीं धान्य निर्यात व आयात करणाऱ्या दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांनीं जर तावडतोब शिधापद्धति अंमलांत आणली तरच १९४६ सालच्या पिकाची जपणूक व वाटणी नीट होणें शक्य आहे असें सांगितलें. शिवाय १९४७ सालांतील पिकें भरपूर काढणेंही अवश्य असल्याचें त्यांनीं प्रतिपादन केलें. प्रे. ट्रूमन यांचे प्रतिनिधि मि. हूवर यांच्याच माहितीवरून असें दिसतें कीं मे ते सप्टेंबर या कालावधींत हिंदुस्थानला २३ लक्ष ३६ हजार टन धान्य आयात करण्याची आवश्यकता आहे. नाहींतर शिधापद्धति मोडकळीस आल्याखेरीज रहाणार नाहीं. या परिस्थितीकडे लक्ष वेधून डॉ. राव यांनीं मे महिना अखेर कमींत कमी ९ लाख टन धान्य आयात होण्याची निकड असतांना फक्त २ लाख टन धान्यच हिंदुस्थानच्या पदरीं पडल्याचें सांगितलें. मद्रास प्रांताचे मजूर मंत्री मि. गिरी यांच्या मतानें अपेक्षित धान्य आयात झालें, लोकांचें सहकार्य मिळालें आणि पाऊस पडावा तसा पडल्यास सप्टेंबर अखेरपर्यंत धान्य परिस्थिति सुधारेल. परंतु त्यापूर्वींचे जून, जुलै आणि ऑगस्ट हे महिने जरा कठीण जाणार असा रंग दिसत आहे. दरम्यान बंगालमधील डाक्का विभागांत भात तांदुळाचा भाव कडाडत चालल्याच्या बातम्या येत आहेत. मुनशीगंज विभागांत २९ रु. मणामागे भाव झाला असून कांहीं भागांत तो ३५ रुपयांपर्यंतही चढला आहे. प्रे. ट्रूमन यांनीं रशिआकडे अन्नधान्याच्या बाबतींत सहकार्य मागितलें होतें. परंतु रशिआजवळच्या शिल्लक धान्यापैकीं ११ लाख टन धान्य दुसऱ्या गरजवंत राष्ट्रांना द्यावयाचें आधींच ठरलें असल्यामुळें आतां आपणास कांहीं करतां येत नाहीं असें स्टॅलिन यांचें उत्तर आलें.

## पिकांस पाणीपुरवठा

कालवे व पाटबंधारे ह्यांचें महत्त्व हिंदुस्थानांत फार मोठें आहे हें दीर्घ काळापूर्वीपासून सांगण्यांत येत आहे, परंतु अद्याप पाणी-पुरवठ्याच्या बाबतींत किती तरी करावयाचें शिल्लक राहिलें आहे! ब्रिटिश हिंदुस्थानांत एकूण ५½ कोटि एकर जमिनीस पाणी मिळूं शकतें असा अंदाज आहे. हा आकडा एकूण पिकाखालील क्षेत्राच्या २२% एवढाच आहे. लोकसंख्येस अन्नपुरवठा पुरेसा व्हावयाचा असल्यास पिकाखालील क्षेत्रांत वाढ झाली पाहिजे व जास्त जमिनीस लागवडीसाठीं पाणी मिळालें पाहिजे. वेगवेगळ्या प्रांतांच्या युद्धोत्तर योजनांवर एकूण ९०० कोटि रुपयांचा खर्च आखण्यांत आला आहे. त्यापैकीं कालवे व पाटबंधारे ह्यांच्या वांट्यास फक्त १५० कोटि रुपयेच आले आहेत, ते अत्यंत अपुरे आहेत. त्याचा प्रांतवार तपशील खालीलप्रमाणें आहे:-

| | लक्ष रु. | | लक्ष रु. |
|---|---|---|---|
| पंजाब | ४०३१ | मद्रास | २७५५ |
| सिंध | १६२४ | बंगाल | ३७०० |
| संयुक्त प्रांत | २१४४ | बिहार | ११७२ |
| मुंबई | ५५० | ओरिसा | ९५ |
| मध्यप्रांत | १५० | सरहद्द प्रांत, आसाम | आकडे उपलब्ध नाहींत. |

मुंबई प्रांताच्या ५½ कोटि रुपयांच्या भांडवली योजनांपैकीं गंगापूर, गिरणा व मुळा योजनांचा तपशील ठरविण्यांत येत आहे.

## सुताचें व कापडाचें उत्पादन आणि कापडाची वाटणी

हिंदी गिरण्यांनीं १९४४-४५ मध्यें एकूण १६२ कोटि पौंड सूत तयार केलें. त्यांपैकीं गिरण्यांनीं कापडाच्या उत्पादनासाठीं ११५ कोटि पौंड सूत वापरलें आणि हातमागांस ४७ कोटि पौंड सूत मिळालें. १९४४ सालीं ६३ लक्ष पौंड सूत निर्गत करण्यांत आलें; १९४५ मधील निर्गतीचा आकडा ५९ लक्ष पौंड भरला. गिरण्यांनीं व हातमागांनीं अनुक्रमें ४७० कोटि वार व १५० कोटि वार कापड तयार केलें. प्रत्येक प्रांतास दर माणशीं खालीलप्रमाणें कापड मिळेल ह्या बेतानें कोटा ठरविण्यांत आला आहे, तो निश्चित करतांना युद्धापूर्वींचा कापडाचा उठाव विचारांत घेण्यांत आलेला आहे.

| | दर माणशीं कापड : वार |
|---|---|
| सिंध, पंजाब, सरहद्द प्रांत व मुंबई | २८ |
| संयुक्त प्रांत | १३½ |
| बिहार, बंगाल, मध्यप्रांत व मद्रास | १२ |
| आसाम व ओरिसा | ११ |

## सहकारी संस्थांचे स्टँडर्ड फॉर्म, बुकें इ.

ले.:—श्री. द. अ. पाटील, मॅ. डायरेक्टर, सटाणा को. सीड सप्लाय अँड सेल सोसायटी लि.

हल्लीं सहकारी संस्थांचा व्यवहार पूर्वीपेक्षां पुष्कळच वाढला असून त्यांत दिवसमानानें अनेक गुंतागुंतीचे व अवघड असे व्यवहार होत आहेत. त्यामुळें त्या बाबींतात माहिती शक्य तितकी बरोबर अपटूडेट ठेवणें भाग पडतें. वॉरटाइममुळें सहकारी सर्व संस्थांचे व्यवहार वाढले त्या मानानें त्यांना लागणारे जरूर ते फॉर्म व संबंधी रजिस्टरें, बुकें, रेकार्ड, पावत्या यांचे नमुने अगर पद्धती या सगळीकडे सर्वसाधारणपणें सारखे नाहींत. ज्याला जो सुचेल तो नमुना तयार करतो व वाटेल तेथें छापून घेतो. त्यामुळें ऑडिटर यांना त्रास होतो. सोसायट्यांचे कारभार खरे असून संशय उत्पन्न होतात, खोटे असले तर ते डिटेक्ट करणेंही कठीण पडतें. कोणत्या वेळीं काय माहिती लागेल त्या दृष्टीनें रेकार्ड ठेवणेंही कठीण होतें. प्रत्येक ऑडिटर निराळीच पद्धत सुचवितो. चालक निराळेंच अनुभवानें करतो.

या सर्व गोष्टींत एकसूत्रीपणा यावा यासाठी एक माहितगार ऑफिसर याच कामासाठी प्रथम कांहीं वर्षे नेमावा व त्याचेकडेस मुंबई इलाख्यांतील सर्व टाइपचा व निरनिराळे व्यवहार करणाऱ्या संस्था आहेत, त्यांनीं सुटसुटीत व संपूर्ण माहितीनिशी कमी शिक्षण घेतलेल्या इसमाकडून अपेक्षिलें जाईल असे माहितीचे स्टँडर्ड फार्म, रजिस्टरें, फायलींची पद्धत ठरवून द्यावी. सोसायट्यांनीं त्यांच्या अडचणी त्यांना कळवाव्यात. त्यांनींहि संस्थेचा अभ्यास करून निश्चित योजना बसवून त्यांत सारखेपणा व सुलभपणा होईल असें करावें व त्यांच्या गरजा व अडचणी भागवाव्यात. नंतर हे सर्व एके ठिकाणीं सरकारी प्रेसमध्यें छापून ठेवावेत अगर तें शक्य नसेल तर कोणतातरी एक चांगला छापखाना निश्चित करून त्याकडे आर्डरी गॅरंटीड अशा कामाच्या देऊन लागणारें सर्व तयार ठेवून त्याचे 'एस' पत्रकाप्रमाणें इंडेक्स व किंमती व मिळण्याचे पद्धतीबाबत व्यवस्था करून केली तर कागदाबद्दलचीं छपाईसंबंधीचीं कामें व मायने, स्टँडर्ड नमुना, संबंधाची सर्व गैरसोय दूर होईल व नवख्या इसमासही सर्वसाधारण जुजबी ट्रेनिंग घेतलेल्यासहि सर्व माहिती ठेवतां येईल व कामगारांना सबबी सांगतां येणार नाहींत व गोंधळ होणार नाहीं व अडचणी दूर होतील, एकसूत्रीपणा येईल. तरी याबाबत जरूर ती व्यवस्था व्हावी असें वाटतें.

## सोसायट्यांच्या सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास, सोलापूर

सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. बँक, सहकारी खातें आणि डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ सुपरवाइझिंग युनिअन सोलापूर यांचे देखरेखीखाली सोलापूर जिल्ह्यांतील ज्या तालुक्यास शेतकी ऋण विमोचन कायदा लागू करणेंत आला आहे तेथील सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरी सुपरवाइझिंग युनिअन बँक आणि सहकारी खात्यांतील फील्ड स्टाफ यांना सदर कायद्यामधील निरनिराळ्या कलमांची माहिती देणें व या बाबतींत ज्या कर्जदार शेतकऱ्यांवर तडजोड बोर्डांनीं निवाडे दिले आहेत व ज्यांच्या अर्जांची चौकशी तडजोड बोर्डापुढे चालू आहे अशा इसमांना सहकारी पतपेढ्या व सेंट्रल व प्रॉव्हिन्शिअल बँक यांनीं पिकासाठीं कर्जे देणेची जी योजना केली आहे त्याबद्दलची सविस्तर माहिती देणेंत आली. हा क्लास ता. ९-५-४६ ते ११-५-४६ अखेर तीन दिवस भरविणेंत आला. सदर क्लासला ११५ सोसायट्यांचे ५५ सेक्रेटरीज हजर होते. प्रारंभीं सें. बँकेचे चेअरमन मे. केळकर साहेब यांचें समयोचित भाषण झाल्यावर मे. के. आर. कुलकर्णी साहेब एम. ए. असि. रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह फायनॅन्स यांनीं उद्बोधक भाषण करून क्लासचें उद्घाटन केलें.

त्यानंतर मे. व्ही. एन. देशपांडे, बी. ए, जी. डी. ए. असि. रजिस्ट्रार को. सो. सोलापूर यांनीं भाषण केलें. वेगवेगळ्या अधिकारी व्यक्तींनीं क्लासमध्यें भाषणें केलीं. प्रत्यक्ष कामांत उपस्थित होणाऱ्या अडचणींसंबंधीं व शंकासंबंधी चर्चा करण्यांत येऊन त्यांबद्दल निरनिराळ्या वक्त्यांनीं स्पष्टीकरण केलें.

## सहकारी खरेदी-विक्री संघ कार्यक्षम कसे होतील ?

( ले. श्री. द. अ. पाटील, मॅनेजिंग डायरेक्टर, सटाणा को. सीड सप्लाय अँड सेल सोसायटी लि. )

शेतकऱ्यांची नुसती भांडवलाची सोय करून त्यांच्या अडचणी भागणार नाहींत. शेतकऱ्यानें तयार केलेल्या शेतीच्या मालाची कमींत कमी खर्चानें, हिशेबशीर पद्धतीनें जास्तींत जास्त किंमत त्याच्या पदरीं पडेल अशा व्यवस्थेची म्हणजे खरेदी-विक्री संघाची जोड दिल्याशिवाय उपयोग नाहीं. कर्ज-निवारण कायद्यान्वयें कर्जाची तडजोड झाल्यानंतर पुढें भांडवल पुरवण्याची व मालविक्रीची सर्व व्यवस्था सोसायट्यांवर टाकलेली आहे. म्हणून खरेदी-विक्री संघाची कार्यक्षमता वाढविणें आवश्यक झालें आहे. सेल सोसायट्यांचे फार पूर्वी तयार केलेले पोट नियम आतां अपुरे वाटूं लागले आहेत. चालू परिस्थितीला धरून ते नवीन तयार केले पाहिजेत. व्यवहाराला अडचणी उपस्थित होऊं नयेत ह्यासाठी खात्यानें अगोदर ठिकठिकाणच्या व्यापारी रिवाजांची पाहणी करावी. ह्या संस्थांना नियमाप्रमाणें व्यवहार करण्यास जितका वाव असेल त्याप्रमाणें भांडवलाची कधींहि उणीव भासणार नाहीं अशी तरतूद पाहिजे. संस्थांचा नोकरवर्गहि लायक पाहिजे. नोकरांनीं संस्थेंत अगर बाहेर व्यापार, तसेंच सभासदांनींहि संस्थेच्या धर्तीवर प्रतिस्पर्धी व्यवहार करण्यास बंदी पाहिजे. दर दोन-तीन महिन्यांत ऑडिट होऊन त्यांतील सूचनांची अंमलबजावणी झाली पाहिजे. क्रेडिट अगर मल्टिपर्पज सोसायट्या, तालुका डे. असोसिएशन्स व हे संघ ह्यांचे कार्यांत स्पर्धा न होतां एकसूत्रीपणा आला पाहिजे.

## बागाइतदार परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे ठराव

डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे अध्यक्षतेखालीं स्थापन झालेल्या डेक्कन क्यानाल्स बागाईतदार परिषदेच्या कार्यकारी मंडळाची सभा ता. १७-४-४६ रोजीं बेलापूर रोड येथें चेअरमन आमदार रामभाऊ गिरमे यांचे अध्यक्षतेखालीं भरून खालील आशयाचे महत्त्वाचे असें ठराव पास करण्यांत आले. सरकारनें घासासाठीं तातडतोब पाणी देण्याची व्यवस्था करावी. जमीन नांगरणेसाठी जास्त ट्रॅक्टरची तरतूद करावी व ते प्रथम शेतकऱ्यांनाच पुरविण्यांत यावेत. बी. आय. सी. स्कीमप्रमाणें शेतकऱ्यानें अमूक जमिनींत अमूकच पीक केलें पाहिजे अशी जी शेतकऱ्यांवर सक्ती केली आहे ती रद्द करून कोणत्या जमिनींत कोणतें पीक करावें ही बाब शेतकऱ्यांचे इच्छेवर ठेवावी. शेतकऱ्यांना पेंड पुरवठ्यासाठीं व्यापाऱ्यांची तातडतोब व्यवस्था करण्यांत यावी व सध्या टनाऐवजीं पूर्वीप्रमाणेंच एकरीं दोन टन पेंड देण्यांत यावी. पेंड वांटणीचें काम व्यापारी किंवा त्यांचें असोसिएशन यांचेकडून योग्य रीतीनें होत नाहीं. तरी त्यांची एजन्सी रद्द करून सदरचें काम ज्या त्या मार्गांतील सहकारी तत्त्वावरच चाललेल्या तालुका डेव्हलपमेंट असोसियशन्स, बागाईतदार संघ या सोसायट्या यांचेकडे तातडतोब यावें. शेतकऱ्यांचें होणारें नुकसान थांबविण्यासाठीं उपळलेल्या जमिनींत चर काढण्याचें काम सरकारनें विनाविलंब हातीं घ्यावें. सन १९४६ सालापासून इरिगेशन खात्यानें पाणीपट्टीचे वाढविलेले दर कमी करणेंत यावेत.

सहकारी पद्धतीवर साखर कारखाने काढण्याबद्दल स्थानिक शेतकरी बागाईतदारांचे अर्ज गेले आहेत. त्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार होऊन ते काढण्याची परवानगी देण्याबद्दल सरकारला विनंति करण्यांत यावी. सहकारी पद्धतीवर साखर कारखाने काढण्याची स्थानिक शेतकऱ्यांची तयारी असतांना भांडवलशाही तत्त्वावर स्थापन झालेल्या कारखान्यांची वाढ होऊं देऊं नये.

## शेतकऱ्यांच्या हत्यारांसाठीं लोखंड-पोलाद

शेतकऱ्यांना शेतीच्या हत्यारांसाठी लोखंड-पोलाद लागतें तें त्यांस स्थानिक दुकानांतून मिळत असे. लोखंड-पोलादावर १९४१ सालीं कंट्रोल बसला, तेव्हांपासून शेतकऱ्यांस तें मिळणें अवघड झालें व त्यास व्यापारहिं भरमसाट किंमती. मागूं लागले. सरकारनें शेतकऱ्यांस जरूर तें लोखंड-पोलाद मिळावें म्हणून जून १९४४ सालीं एक योजना आंखली, सरकारचा मेकॅनिकल व ट्रॅन्स्पोर्ट इंजिनिअर आवश्यक तें लोखंड-पोलाद विकत घेऊन मुंबई व हुबळी येथील सरकारी गुदामांत ठेवतो. सरकारनें मान्य केलेल्या संस्था व एजंट ह्यांचेकडून मागणी येईल त्याप्रमाणें तें टनास १६ रु. ४ आ. ह्या दरानें पाठविण्यांत येतें. ह्या संस्था व एजंट ह्यांच्या विक्रीच्या व्यवहारावर सरकार देखरेख ठेवतें. तथापि अजूनहि योग्य किंमतीस लोखंड-पोलाद मिळूं शकत नाहीं, अशी मधूनमधून तक्रार ऐकूं येते. सध्यां ज्या डेव्हलपमेंट असोसिएशन्स सहकारी सोसायट्या किंवा एजंट्स ह्यांकडे हें काम दिलें आहे. त्यांच्या व्यवहाराचीं केंद्रें खेडेगांवापासून फार दूर असल्यास आणि आणखी संस्थांकडे हें काम सोपविल्यास सोई वाढणार असल्यास त्याप्रमाणें शेतकऱ्यांनीं सरकारास लिहून कळवावें.

---

## बॉंबे को. क्वार्टर्ली

बॉंबे को. क्वार्टर्लीच्या ताज्या अंकांत कै. प्रा. वा. गो. काळे ह्यांच्या सहकारी क्षेत्रांतील कामगिरीचे वर्णनपर कांहीं लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांत श्री. व्ही. एस. भिडे, प्रा. द. गो. कर्वे, प्रा. सी. एन. वकील, दिवाण बहादूर सी. एम. गांधी इत्यादींचे लेख प्रमुख आहेत. श्री. डी. ए. शहा ह्यांनीं सुरत जिल्ह्यांतील सोनसेक येथील कपास विक्रीच्या सोसायटीचा उद्बोधक इतिहास आपल्या लेखांत दिला आहे. ह्या सोसायटीच्या स्थापनेस लवकरच २५ वर्षे पुरीं होतील. श्री. के. बा. गजेंद्रगडकर वकील ह्यांनीं बॉंबे अॅ. डे. रिलिफ ॲक्टाच्या प्रमुख कलमांची छाननी आपल्या लेखांत सुबोधपणें केली आहे. पुस्तक-परीक्षण, संपादकीय स्फुटें, इन्स्टिट्यूटचें कार्य, सहकारी बातम्या, रजिस्ट्रारचीं सर्क्युलरें, पत्रव्यवहार इत्यादि नेहमीचीं सदरें अंकांत आहेतच.

---

## येवला येथें सेक्रेटरी रि. ट्रेनिंग क्लास

मुंबई प्रॉ. को. इन्स्टट्यूटच्या विद्यमानें येवला येथें ता १८-४-४६ ते २५-४-४६ असेर सेक्रेटरी रिफ्रेशर ट्रेनिंग क्लास ८ दिवसांचा भरविण्यांत आला. सदर क्लासचा उद्घाटन समारंभ मे. श्रीधर रावजी पाटील, नगरसूल, यांचे हस्तें झाला. ट्रेनिंग क्लासचा फायदा १२ लोकांनीं घेतला. सदर क्लासला मे. एन. वाय. कुलकर्णी एज्यु. सुपरवायझर डि. यू. बी. नाशिक यांनीं सर्व विषयांचें शिक्षण दिलें व मे. एम. के. गांधी सुपरवायझर, येवला यांनीं मधून मधून हिशोबाची माहिती सांगितली व मे. यू. एस. पाटील, सब ऑडिटर सी. एम. मालेगांव यांनींही 'सहकार्य' या विषयावर मुलांस बोध केला.

---

**अन्नपुरवठ्यांत भेदाभेद**—" हिंदी अन्न परिस्थिति आटो‍ क्याबाहेर चालली आहे आणि ती युरोपांतील कोणत्याहि देशांतील परिस्थितीपेक्षां जास्त बिकट आहे. तथापि, जर्मनी व इतर युरोपियन देशांस धान्य पुरविण्यासच प्राधान्य देण्यांत येत आहे. हा भेदाभेद लक्षांत घेण्याजोगा आहे. "—सर रामस्वामी मुदलियार ह्यांची स्पष्टोक्ति.






सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
[स्थापना १९१८] सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
टे. नं. ३१६७५ ३०-४-१९४६

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ४,००,००० |
| वसुल झालेलें भांडवल ... | रु. ३,३०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. १,७८,००० |
| ठेवी ... | रु. ६०,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ६७,००,००० |

नवीन योजना—"विम्याचे हप्ते, कॉलेज फी, हॉस्पिटल खर्च, कपडा, प्रवास खर्च वगैरे गरजांची खर्चविभागणी सुलभ रीतीनें करतां यावी, यासाठी ही योजना आहे. या योजनेनुसार दर महिना ५ ते २५ रु. पर्यंत बचत करून २ टक्के व्याज मिळवितां येतें."

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा—

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब-ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )



## खनिज तेलांचें राजकारण

खनिज तेल ही आधुनिक जीवनास व व्यवहारास अत्यंत आवश्यक अशी बाब होऊन बसली आहे. त्याचे अभावीं वहातुक अशक्यप्राय आहे, कारण रस्त्यांवरील कोटयवधि वहानें पेट्रोलवरच अवलंबून आहेत. केरोसीन तेलाचे उपयोगहि सुप्रसिद्ध आहेत. इंजनें चालण्यास तेलाचा उपयोग वाढत्या प्रमाणावर करण्यांत येऊं लागला आहे. वंगणाचीं तेलें हीं मुख्यतः पेट्रोलियमपासुनच काढलेलीं असतात. कृत्रिम रबर, प्लॅस्टिक्स, अलकोहोल इत्यादींच्या उत्पादनास क्रूड ऑईलचें महत्त्व फार मोठें आहे. युद्धकाळापुरतेंच पेट्रोलियमचें महत्त्व मर्यादित नसून, शांततेच्या काळींहि पेट्रोलियम तेलांवाचून सर्वांचें अडणार आहे. ह्या तेलावर ताबा मिळविण्यासाठी प्रबळ राष्ट्रांचे प्रयत्न एकसारखे चालू असतात. अमेरिका व रशिया ह्यांच्या स्वतःच्या हद्दींत पुरेसें पेट्रोल आहे परंतु ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान ह्या सर्वांस कमी-अधिक प्रमाणांत पेट्रोलसाठी इतर देशांवर अवलंबून रहावें लागतें. १९१४ ते १९३७ ह्या मुदतींत जगांतील तेलाचें उत्पादन पूर्वींइतकेंच कायम राहिलें, त्यावरून पेट्रोलियमवर ताबा मिळविण्याच्या धडपडीचें रहस्य लक्षांत येईल. रशियांतील व मेक्सिकोंतील तेलाच्या खाणी त्या राष्ट्रांच्याच मालकीच्या आहेत. इराण व इराक ह्या देशांतील पेट्रोलियमच्या खाणींचे धंद्यांत अँग्लो-इराणिअन ऑइल कंपनी व इराक पेट्रोलियम कंपनी ह्यांचे द्वारां ग्रेट ब्रिटननें वर्चस्व मिळविलें आहे. कांहीं मोठ्या अमेरिकन कंपन्या आणि डच शेल गट ह्यांचेमध्यें बाकीच्या ठिकाणच्या तेलाचा ताबा विभागलेला आहे. अमेरिका, ग्रेट ब्रिटन, रशिया, नेदरलंडस आणि मेक्सिको ह्यांचेकडे तेलाच्या वाटणीचा मोठा हिस्सा जातो आणि त्यांपैकीं अमेरिका, ग्रेट ब्रिटन व नेदरलंडस ह्यांनीं आपल्या देशांबाहेरील मुलखांत मोठ्या प्रमाणावर तेलावरती वर्चस्व मिळविलें आहे. इराणमधील तेलावर रशियाचा डोळा असून त्या देशाकडून तो सवळती मिळविण्याच्या खटपटींत आहे.

---

## सोव्हिएट रशियाची पंचवार्षिक योजना

सोव्हिएट रशियानें गेल्या महायुद्धांत झालेलें नुकसान भरून काढून राष्ट्राची आर्थिक परिस्थिति पूर्ववत् सुधारण्यासाठी १९४६–५० या कालावधीचा पंचवार्षिक कार्यक्रम आखल्याचें प्रसिद्धच आहे. या कार्यक्रमांत गुंतविण्यासाठी २ अब्ज रूबल्सचें कर्ज उभारल्याचें रशियन अर्थमंत्री एम. झ्वेरेव्ह यांनीं जाहीर केलें. हें कर्ज २० वर्षें मुदतीच्या करमाफ बॉंडसच्या रूपाने विक्रीस काढण्यांत आलें असून, तें फक्त दोन दिवसांतच संपून गेलें. हे बॉंडस् फक्त रशियन नागरिकांनाच विकत घेतां येतील, आणि बॉंडसच्या कर्जाची परतफेड वार्षिक लॉटऱ्या काढून होईल असा हुकूम अर्थ खात्याने काढलेला आहे. लॉटरी बक्षिसावर कर घेतला जाणार नाहीं. कर्जाच्या हेतुसंबंधीं बोलतांना एम. झ्वेरेव्ह म्हणाले कीं, सोव्हिएट राष्ट्राची सुरक्षितता अधिक खंबीर करण्यासाठी राष्ट्राचें आर्थिक व लष्करी सामर्थ्य अत्यंत कार्यक्षम करणें जरूर आहे. बल्गेरियांतील अमेरिकेचे माजी वकील यांनी सोव्हिएट रशियाविरुद्ध अॅटम बॉंबचा उपयोग करावा असे उद्गार काढलेले प्रसिद्ध झाले आहेत. इंग्लंड अमेरिकेंतील प्रतिगामी गट नव्या सोव्हिएट विरुद्ध युद्धाचा प्रचार करीत असून त्यामुळें रशिया आपल्या सुरक्षिततेची अधिक काळजी घेऊं लागला आहे असें दिसतें. असें युद्ध तूर्त कांहीं वर्षें होण्याची शक्यता नसली तरी रशियाच्या पंचवार्षिक योजनेचे आर्थिक परिणाम रुमेनिया, बल्गेरिया, हंगेरी, पोलंड व युगोस्लव्हिआ इतक्या देशांच्या अर्थव्यवस्थेवर होऊन युरोपांत समाजवादी पद्धतीचा 'रूबल ब्लॉक' उत्पन्न होणार असा रंग दिसतो.

## जपानमध्यें कापडाच्या उत्पादनावर नियंत्रण

युद्धसमाप्तीचे वेळीं जपानी गिरण्यांतील चात्यांपैकी फक्त २५% चात्या शाबूत होत्या आणि कपाशीचा साठा पार खलास झालेला होता. सुमारें ३,५०,००० चात्यांची लवकरच दुरुस्ती होऊं शकेल आणि १९४६ अखेर सर्व जपानी गिरण्यांत मिळून ३५,००,००० चात्या चालू होऊं शकतील. युद्धापूर्वी जपानची कापडाची अंतर्गत मागणी २२० कोटि वारांची आहे, ती भागविण्यास जपानी गिरण्यांचें उत्पादन कसेंबसें पुरें पडूं शकेल आणि निर्गतीस वाव राहणार नाहीं अशी आजची परिस्थिति आहे. युद्धकाळांत झालेली लोकसंख्येमधील वाढ, शिलकी मालाचा झालेला नाश, इत्यादि लक्षांत घेतां जपानी गिरण्यांस कांहीं वर्षें स्थानिक मागणी पुरविण्यापलीकडे दुसरें कांहीं करतां येणार नाहीं. जपानी कारखानदारांना पोलाद व इतर माल उपलब्ध करून दिला तर ते सहा महिन्यांतच आणखी १५,००,००० चात्या बसवूं शकतील. परंतु जपानमधील गिरण्यांचे बाबत कोणतें धोरण आंखावें हें जेत्यांनीं अद्याप निश्चित केलेलें नाहीं. जपानमध्यें रोगराई पसरूं नये व दंगेधोपे होऊं नयेत एवढ्या पुरताच कच्चा माल जपानमध्यें जाऊं द्यावा, असें एक मत आहे. सबंद जगांत कापडाचा तुटवडा पडला आहे तो दूर करण्यासाठीं जपानी गिरण्यांची उत्पादनशक्ति उपयोगांत आणावी असें दुसरें मत आहे. जपानमध्यें कच्चा माल पाठवून त्याचेकडून पक्का माल करून घ्यावा, मात्र ह्या सर्वांवर जपान्यांचें यत्किंचितही नियंत्रण असूं नये, म्हणजे अमेरिकन, ब्रिटिश व हिंदी गिरणी मालकांस तक्रारीस जागा उरणार नाहीं असें सुचविण्यांत येत आहे. जपानी लोक अमेरिकनांस खूष करण्याचा यत्न करीत आहेत व जपानी कापडाची निर्गत होऊं दिली तर अमेरिकेची लक्षावधि गाठी कपास जपानमध्यें खपूं शकेल असें ते पुढें मांडीत आहेत. कोरिया, फोर्मोसा, मांचुरिया वगैरे शेजारच्या देशांकडे जपाननें माल पाठविण्यांत अमेरिकन व्यापाराचें नुकसान नाहीं, असें जपानी हितसंबंधी लोकांचें म्हणणें आहे. जपानी गिरण्या मोठ्या प्रमाणावर कापड तयार करूं शकल्या तरी त्यांस प्रतिबंध करण्याचे जेत्या राष्ट्रांचे हेतु स्पष्टच आहेत.

---

**हिंदुस्थानांतील ब्रिटिश आर्थिक हितसंबंध**—हिंदुस्थानांतील इंग्रज व्यापारी व कारखानदार आपला व्यवसाय हिंदी लोकांस विकूं लागले आहेत. दक्षिण हिंदुस्थानांतील कित्येक चहाचे मळे इंग्रजांच्याच मालकीचे होते ते आतां हिंदी मालकीचे झाले आहेत. कांहीं कंपन्यांची व्यवस्था ब्रिटिश फर्म्सकडे असली तरी कंपन्यांतील बहुसंख्य शेअर्सची मालकी हिंदी लोकांच्या हातीं आली आहे. हिंदी राजघटनेमधील व्यापारी संरक्षणाची कलमें दीर्घकाल रहाणार नाहींत ही जाणीव वरील प्रवृत्तीच्या मुळाशीं आहे. हिंदुस्थानास संपूर्ण स्वातंत्र्य ब्रिटिश सरकारनें देऊं केलें आहे, त्यामुळेंही इंग्रज व्यापारी व कारखानदार ह्यांस आपलें छत्र नाहींसे होण्याची भीति वाटूं लागली आहे.

**असेंब्लीच्या आठ कपातींपैकी तीन मान्य:**—मध्यवर्ती असेंब्लीनें हिंदुस्थान सरकारच्या बजेटांत आठ कपाती केल्या होत्या. त्यांपैकीं पांच कपाती गव्हर्नर-जनरल इन कौन्सिलनें मान्य केल्या आहेत. (१) त्यामुळें, (२) फिनॅन्स बिलावरील चर्चेच्या वेळीं सरकारनें कांहीं कर कमी केल्याचें कबूल केल्यामुळें आणि (३) पोष्ट कार्डाची किंमत उतरविल्याकारणानें १९४६–४७ मध्यें हिंदुस्थान सरकारला येणाऱ्या तुटींत ४ कोटि १९ लक्ष रुपयांची भर पडणार आहे. अपेक्षित तूट आतां ४८३ कोटि रुपये आहे.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं
असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )
स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग,
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

अधिकृत भांडवल :: रु. २५,००,०००
काढलेलें भांडवल :: रु. २२,००,०००
भरलेलें भांडवल :: रु. १९,८९,५००
खेळतें भांडवल रु. ५,००,००,००० वर

..........शाखा व उपशाखा.........

| | |
|---|---|
| १ सातारा ( जि. सातारा ) | २४ लासलगांव (जि. नाशिक) |
| २ कऱ्हाड ,, | २५ मालेगांव ,, |
| ३ किर्लोस्करवाडी ,, | २६ नांदगांव ,, |
| ४ कोरेगांव ,, | २७ घोटी ,, |
| ५ इस्लामपूर ,, | २८ सटाणा ,, |
| ६ शिराळें ,, | २९ येवलें ,, |
| ७ तासगांव ,, | ३० मनमाड |
| ८ वांई ,, | ३१ धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ लोणंद ,, | ३२ दोंडाईचें ,, |
| १० भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ नंदुरबार ,, |
| ११ कल्याण ,, | ३४ साक्री ,, |
| १२ पालघर ,, | ३५ शहादें ,, |
| १३ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिरपूर ,, |
| १४ अहमदनगर ( ,, अहमदनगर ) | ३७ शिंदखेडें ,, |
| १५ बेलापूर रोड ,, | ३८ तळोदें ,, |
| १६ कोपरगांव ,, | ३९ नरढाणा |
| १७ पाथर्डी ,, | ४० दोह्द (जि. भडोच व पंचमहाल) |
| १८ राहुरी ,, | ४१ गोध्रा ,, |
| १९ शेवगांव ,, | ४२ झालोद ,, |
| २० वांबोरी ,, | ४३ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २१ बेलापूर (गांव) ,, | ४४ नाडियाद ( जि. खेडा ) |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद) | ४५ आनंद ,, |
| २३ नाशिक ( जि. नाशिक ) | ४६ बोरसाड ,, |

**या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.**

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## विनचूकच्या माहितीनें

स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.
किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
पूना स्टॉकिस्ट : सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
—— :इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत : ——

## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७७३८




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.




हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.